# प्रसिध्दी पत्रक

दिनांक : १४/०५/२०२३

**ग्रामपंचायत मौ.सलगरा (खुर्द) येथील सरपंच सौ.ज्योती खंडेराव पवार व ग्रामसेवक श्री शांताराम देविदास गवई यांनी रमाई घरकुल योजनेचा लाभ मिळून देण्यासाठी लाभार्थी यांचेकडून ५०००/–रुपये लाच स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड युनिट |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | पो.स्टे.मुखेड गुरन. १४७/२०२३ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ |
| गुन्हा दाखल तारीख व वेळ | दि. १३/०५/२०२३ रोजी २१.२६ वाजता |
| आरोपी लोकसेवक यांचे नाव, हुद्दा व पत्ता | १)सौ. ज्योती खंडेराव पवार वय ४० वर्ष,पद सरपंच,ग्रामपंचायत मौ.सलगरा(खुर्द),(ईतर लोकसेवक), रा.मौजे सलगरा (खुर्द), ता.मुखेड,जि.नांदेड<br>२) श्री शांताराम देविदास गवई वय ५२ वर्ष,व्यवसाय नौकरी,पद ग्रामसेवक, मौजे सलगरा (खुर्द) तालुका मुखेड जि.नांदेड,रा.भोकर. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ८०००/– रू. लाचेची मागणी करून तडजोडी अंती ५०००/– रू लाच स्विकारली |
| थोडक्यात माहिती | तक्रारदार यांच्या आईच्या नांवाने मौजे सलगरा (खुर्द) येथे कच्चे घर असुन रमाई आवास योजने अंतर्गत घरकुल योजना लाभ मिळावा याकरीता तक्रारदार यांनी ग्रामपंचायत कार्यालय मौ. सलगरा (खुर्द) येथील सरपंच सौ.ज्योती पवार यांना त्या संदर्भात भेटले असता त्यांनी तुमचे घरकुल योजनेचा प्रस्ताव मंजुर करावायाचा असेल तर ५०००/– रुपये द्यावे लागतात अशी लाचेची मागणी केली. दिनांक १३.०५.२०२३ रोजी लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान आरोपी क्रमांक १ सरपंच सौ.ज्योती पवार यांनी पंचा समक्ष लाचेची मागणी करुन आरोपी क्रमांक २ शांताराम देविदास गवई यांनी तक्रारदार यांना घरकुलासाठी ८०००/– रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती. ५०००/– रुपये लाच स्विकारण्याचे मान्य केले. सापळा कार्यवाही दरम्यान आरोपी क्रमांक १ ज्योती पवार यांनी पंचाचे समक्ष लाच स्विकारली व आरोपी क्रमांक २ ग्रामसेवक श्री शांताराम गवई यांच्या मोटार सायकलने पळून जात असतांना सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी पकडून आरोपी क्रमांक १ यांच्या ताब्यातुन लाचेची रक्कम ५०००/– रुपये जप्त करण्यात आले असुन दोन्ही आरोपी लोकसेवकांचे विरुध्द पोलीस स्टेशन मुखेड येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |
| सापळा पथक | सदरची कार्यवाही ला.प्र.वि. नांदेड परिक्षेत्र नांदेड चे डॉ.श्री राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक, यांचे मार्गदर्शनाखाली, तसेच श्री राजेंद्र पाटील, पोलीस उपअधीक्षक यांच्या पर्यवेक्षणात पोलीस उप अधिक्षक श्री अशोक इप्पर, पोलीस निरीक्षक श्रीमती स्वप्नाली धुतराज, पोहेकॉ/मेनका पवार, पोकॉ/कुलथे, पोकॉ/सयद खदिर, चापोना/प्रकाश मामुलवार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड युनिट नांदेड. |
| गुन्हयाचा तपास | श्रीमती स्वप्नाली धुतराज,पोलीस निरीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नांदेड हे करीत आहे |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की , भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबददल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.

| संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड, नागार्जुनसागर बिल्डील स्नेहनगर/श्रीनगर नांदेड | |
|---|---|
| संपर्क कमांक :– 02462–253512<br>टोल फ्री कमांक– 1064 | ऑनलाईन तकार ॲप्लीकेशन acbmaharashtra.net |
| मा. पोलीस अधीक्षक 9623999944 | पोलीस उपअधीक्षक 7350197197 |
| ई–मेल आयडी<br>spacbnanded@gmail.com | dyspacbnanded@gmail.com |
| FACEBOOK – Dysp Acb Nanded | TWITTER - @ACBnanded |
| INSTAGRAM – acb_nanded | |

कार्यालय,पोलीस उप अधीक्षक ला.प्र.वि.नांदेड,युनिट

(अशोक इप्पर)
पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड